# डॉ. मनो जुमदेवजी ठुब्रीकर

सेवक क्र. ०१

मु. टिमकी, नागपूर

**मला आलेले अनुभव :**

१९६३ किंवा ६४ साल असावे. माझ्या हिस्लॉप कॉलेजमधील एक मित्र नंदकुमार डोये हा तुमसर खेड्याचा (पो. चोपा) जमीनदार होता. एकदा मी त्याच्या गावाला गेलो होतो. त्याचा वाडा फार भव्य होता. आमची झोपायची खोली एका कोपऱ्याला, त्याच्या वडीलांची खोली दुसऱ्यास कोपऱ्याला तर जेवण करण्याच्या जागा तिसऱ्या कोपऱ्याला असा एकंदरीत त्याचा वाडा होता. तेथे लाईट वगैरे नव्हते. आमच्या खोलीत एक गाठोडे होते. नंदा(नंदकुमार) मला म्हणाला, त्या गाठोड्याला हात लावू नकोस. लावल्यास धोका होऊ शकतो. काही वेळानंतर माझी जिज्ञासा वाढली व मी त्या गाठोड्यात काय आहे हे पाहण्याकरिता ते उघडले. त्यात एक खूप जुने पुस्तक होते. ते पुस्तक मी चाळू लागलो. तेवढ्यात नंदा परत आला व मी पुस्तक चाळत आहे हे पाहून एकदम मला म्हणाला, मनो हे तू काय केले? हे पुस्तक पाहिल्यास कोणता धोका होईल. हे मी सांगू शकत नाही. मला खरचं भिती वाटायला लागली. मी नंदाला विचारले, काय होऊ शकते मला? तो म्हणाला, तू जगशील की नाही हे सांगू शकत नाही. काही वेळ असाच निघाला व त्या रात्री आम्ही सर्व झोपलो. झोपेत मला असा भास झाला की, आता आपला प्राण जाणार. मी जोरजोराने नंदा, नंदा असा आवाज देत होतो. फक्त माझे तोंड हालत आहे पण आवाज बाहेर पडत नाही, असा मला वाटते. तेव्हा मनात एक विचार आला, असा कसा मी मुर्ख! आपल्या भगवंताला हाका न मारता नंदाला हाका मारीत आहे. त्यावेळी मी अंतःकरणात 'बाबा हनुमानजींचे' स्मरण केले. त्याच क्षणी माझ्या गळ्यावरचा दाब एकदम नाहीसा झाला. नंतर मी डोळे उघडले तेव्हा मला त्या खोलीत टॉर्च सुरु ठेवलेला दिसला आम्ही तिथे अंधारात झोपत होतो. अशाप्रकारे भगवंताने माझी वरील संकटातून सुटका केली.

१९७५ ची ही गोष्ट आहे. जुलै १९७५ मध्ये माझा पीएच.डी. चा अभ्यास पूर्ण झाला. मी १९७४ पासूनच नोकरीसाठी प्रयत्न करीत होतो. कुठे नोकरी मिळेल असे वाटत नव्हते. काही विचारायचे, ग्रीन कार्ड आहे काय? काही म्हणायचे आम्ही काही दिवसांनी सांगू. एका वर्षात ४०-५० ठिकाणी नोकरीसाठी अर्ज केले, पण कुठेच जमले नाही. ह्या काळात मी माझ्या दोन प्रोफेसर्सना नोकरीसाठी मला मदत करा

असे नेहमीच म्हणत होतो. पण कुठेच जमेल असे दिसत नव्हते. शेवटी शिक्षण संपायला दोनच महिने राहिले तेव्हा मला नोकरीबद्दल जास्तच काळजी वाटू लागली. जर नोकरी मिळाली नाही तर माझा प्रपंच कसा चालेल? माझ्यजवळ ग्रीन कार्ड नव्हते, म्हणून नोकरी मिळणे अशक्य असल्यासारखे दिसत होते. त्याचवेळी मनात विचार आला की, मी कसा अज्ञानी आहे. एका परमेश्वराला मदत न मागता नुसता प्रयत्नच करीत आहे. तेव्हा परमेश्वराला विनंती केली की, मला नोकरी लवकर लागायला पाहिजे. नंतर २-४ दिवसांतच सुधाला (पत्नीला ) एका व्यक्तीने सांगितले, डॉ. येलीनशी नोकरीबद्दल गोष्टी करा. मी जेव्हा त्यांच्याशी बोललो तेव्हा ते म्हणाले, सध्या तशी पोझीशन तर नाही. पण पोझीशन तयार करायची इच्छा आहे. तुम्ही इंटरव्ह्युकरिता या. मी जेव्हा इंटरव्ह्यू देण्याकरिता गेलो, तेव्हा इंटरव्ह्यू घेतानाच त्यांनी मला नोकरी दिली. मी नोकरी स्वीकारली. पण मी म्हटले पगार कमी सांगता म्हणून मला ही नोकरी स्वीकारावीशी वाटत नाही. मी घरी परत आलो. दुसऱ्याच दिवशी डॉ. येलीन यांनी मला फोन केला व ३,००० डॉलर देऊ म्हणून सांगितले. मला पगारापेक्षा जास्त वाढ दिली तेव्हा ती नोकरी मी स्वीकरली. परमेश्वराची मदत अशी मिळाली की, ग्रीन कार्ड नसल्यामुळे वर्षभर प्रयत्न करुनही जी नोकरी मिळाली नाही ती एका महिन्यात घडामोडी होऊन मिळाली व ती आपल्याच शब्दावर मिळाली. नोकरीची जागा तयार नसतानासुध्दा जागा तयार होऊन मिळाली. पीएच.डी. चे थिसीस जुलै महिन्याच्या शेवटी दिले व दोन महिन्यांनी नोकरीवर रुजू झालो. तीच नोकरी आतापर्यंत आहे व फार चांगली आहे.

ही गोष्ट १९७७ ची आहे. मी १९७५ पासून इमिग्रेशन(ग्रीन कार्ड) साठी प्रयत्न करीत होतो. नोव्हेंबर १९७६ मध्ये इमिग्रेशन मिळेल असे इमिग्रेशन ऑफीसरांनी मत व्यक्त केले होते. जानेवारी १९७७ मध्ये पिटीशन मंजूर झाला होता. मला ४-५ महिन्यात इमिग्रेशन मिळेल से वाटू लागले. माझे नागपूरला जायचे दिवस जवळ येत होते. इमिग्रेशन मिळाले नव्हते. इमिग्रेशनच्या इंटरव्ह्यू जून १९७७ मध्ये झाला. पण जुलैपर्यंत इमिग्रेशन (ग्रीन कार्ड) मिळाले नव्हते. त्यामुळे अशी चिंता निर्माण झाली की, नोव्हेंबरपासून नागपूरला जाण्याचा प्रोग्राम आहे, पण काहीच साध्य होत नाही. आपल्याला ग्रीन कार्ड केव्हा मिळेल व आपण केव्हा नागपूरला जाऊ याची काळजी लागली होती. वार्षिक हवनकार्य जवळ येत होते. जुलैमध्ये मी ग्रीन कार्डाकरिता फोन करुन विचारले तर मला कळले की, ज्या ऑफीसरांनी माझा इंटरव्ह्यू घेतला होता ते सुटीवर होते व ते आल्याशिवाय काही होऊ शकत नव्हते. ग्रीन कार्डाशिवाय विमानाच्या तिकीटाचे रिझर्व्हेशन होऊ शकत नाही. काय करावे, हे सुचत नव्हते. ऑफीसर सुटीवर आहे हे ऐकल्यावर मी बाबा हनुमानजीला विनंती केली व म्हटले, परमेश्वरा, आम्हाला तुझ्या हवनकार्याला यायचे आहे. यात कोणी अडवू नये. रात्री मला एक स्वप्न पडले. त्या स्वप्नात बाबा हनुमानजी इमिग्रेशन ऑफीसमध्ये गेले. त्यांनी एका ऑफीसमधल्या काही फाइली काढून दुसऱ्या

ऑफीसमध्ये नेल्या. फाइल घेऊन जाताना अदला-बदल केली. काही दिवसानंतर मी पुन्हा फोन केला. जो ऑफीसर सुटीवर गेला होता तो सुटीवरच होता. नंतर एका बाईने म्हटले की, थांबा! मी पाहते, कोणी ह्या कामाला मदत करु शकत काय? नंतर त्या बाईने दुसऱ्या ठिकाणी फोन करायला सांगितले. दुसऱ्या बाईने तिसऱ्या ठिकाणी फोन करायला सांगितले. तुमचे कार्ड तयार करुन ठेवते. तुम्ही उद्या या व कार्ड घेऊन जा. दुसऱ्या दिवशी त्या ऑफीसला पोहोचलो व मला ग्रीनकार्ड मिळाले. परमेश्वराच्या मदतीने ऑफीसर नसतानाही ग्रीन कार्ड मिळाले त्यानंतर आम्ही आठ दिवसांतच हवनकार्याच्या आधी नागपूरला येऊन पोहोचलो.

**कु. वैशालीचा अनुभव :**


ही गोष्ट १९७८ ची आहे. वैशालीचा जन्म ३० नोव्हेंबर १९७८ ला शॉरलॉट सन्हीलाला झाला. दवाखान्यातून १-२ दिवसातच सुधाला सुटी मिळणार होती. डॉक्टरांनी जेव्हा वैशालीची तपासणी केली तेव्हा तिचा Billie Ruben जास्त आहे असे सांगितले. त्याकरिता तिला हॉस्पीटलमध्ये ठेवा असे सांगितले. जर लिव्हर व्यवस्थित काम करित नसेल तर Billie Ruben चे प्रमाण रक्तात जास्त होते. बाळंतपण झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी घरी जावे व आमच्या घरी वैशाली जन्माला आली तर तिला आशिर्वाद द्या, अशी परमेश्वराला विनंती करावी असे आम्हाला वाटत होते. आम्ही डॉक्टरला विचारले, इथे वैशालीचा काय उपचार कराल? त्यांनी सांगितले की, तिला पिवळ्या लाईटच्या समोर ठेवू व दर सहा ते आठ तासांनी तपासणी करु. घरी नेण्यास धोका होऊ शकतो. तेव्हा तुम्ही तिला घरी नेऊ नका असे सांगितले. आम्ही दोन दिवस तिथेच राहिलो, पण वैशालीचा Billie Ruben कमी झाला नाही. वैशालीची प्रकृती जरी चांगली होती, तरीपण रक्ताच्या तपासणीमध्ये Billie Ruben जास्त दिसायचा. चौथ्या दिवशी आपण वैशालीला अजून घरी नेले नाही, याचे आम्हाला फार वाईट वाटले. त्या दिवशी मन बरेच अस्वस्थ होते. दुपारच्या वेळी मी आणि सुधाने काय करावे, याबद्दल विचार केला. तेव्हा आम्ही दोघांनीही मुलीला घरी घेऊन जाण्याचा निर्णय घेतला. निर्णय घेतल्यानंतर मन एकदम शांत झाले. मनाला अशांतीपासून शांतीत बसविणे हे कार्य इतके परिणामकारक झाले की, जसे डोळे बंद होणे व उघडणे यामध्ये फरक आहे. डॉक्टरांशी मुलीला घरी नेण्याबद्दल बोललो तर ते म्हणाले, मुलीला घरी नेऊ नका. काही कमी जास्त झाले तर कोण उपाय करील? आम्ही मुलीला Billie Ruben चेक करण्याकरिता घेऊन येऊ. वैशालीला घरी आणल्यानंतर परमेश्वराला विनंती केली. तेव्हा मुलीचा Billie Ruben कमी झाला. दुसऱ्या दिवशी मुलीला तपासल्यावर डॉक्टर म्हणाले, तुम्ही घरी जे काही करीत आहात तेच घालु द्या, कारण त्याचा

परिणाम चांगला होत आहे.

परमेश्वराने आमची श्रध्दा कच्ची आहे की पक्की आहे याची जणू परीक्षाच घेतली. जेव्हा आम्ही सिध्द करुन दाखविले की आमची श्रध्दा पक्की आहे. तेव्हाच आमच्यावर परमेश्वरी कृपा झाली.

**डॉ. मनो ठुब्रीकर यांना दि. २८. १२. १९८३ रोजी आलेला प्रत्यक्ष अनुभव :**


आम्ही (मी, सौ. सुधा, वैशाली व विशाल) सगळ्यांनी मिळून ख्रिसमसच्या **(Christmas)** सुटीत दिनांक २८.१२.१९८३ रोजी विलीयम्सबर्गला **(Williamsburg)** फिरायला जायचे ठरविले. काही मित्रांना आम्ही कार्यक्रमाबद्दल सांगितले. त्यापैकी एक मित्र आमच्याबरोबर येण्यास तयार झाला. हे मित्र (पती-पत्नी सुधीर आणि स्नेह बर्मन) आम्ही चौघेपण असे माझ्या कारने विलीयम्सबर्गला जाण्यास निघालो. तिथे आम्ही दोन खोल्या घेतल्या. त्या एकमेकींना लागून होत्या. मध्ये एक दरवाजा होता. तो दरवाजा आम्ही उघडा ठेवला. काही वेळपर्यंत वैशाली व विशाल दोघेही खोलीत खेळत होते. नंतर तो दरवाजा बंद करुन आम्ही सगळे झोपलो. त्या रात्री मला एक स्वप्न पडले : आम्हाला वाचवा! वाचवा! असे स्नेह खूप जोराने ओरडत आहे असे स्वप्नात मी पाहिले. मला असा भास झाला की बाजूच्या रुममध्ये कोणीतरी खूप मोठी वाईट शक्ती सुधीरचा जीव घेत आहे व सुधीर त्या शक्तीबरोबर लढा देत आहे. स्नेह भितीमुळे वाचवा! वाचवा! अशी ओरडत आहे. मला स्वप्नामध्ये जाग आली आणि मी उभा राहिलो. ही वाईट शक्ती सुधीरला मारील आणि त्यानंतर माझ्या खोलीमध्ये पण येईल अशी भिती मला वाटू लागली. स्नेह मदतीसाठी ओरडत आहे तेव्हा कर्तव्य समजून त्यांना वाचविण्याकरिता मदतीला जावे असे वाटले. पण आपण एवढ्या मोठ्या शक्तीशी सामना कसा करु शकू म्हणून जावे की नाही हा प्रश्न माझ्या मनात आला. नंतर मी मोठ्या हिंमतीने जाण्याचे



ठरविले. तेव्हा मी उजव्या हातात एक जळती मेणबत्ती घेऊन हात समोर करुन 'बाबा हनुमानजी जागृत रहे' असे म्हणून एक पाऊल पुढे टाकले. स्नेह सारखी मदतीकरिता ओरडतच होती. त्यामुळे मनाला जास्तच भिती वाटू लागली. मी थांबलो. मनात जावे की जाऊ नये हेच विचार होते. पुन्हा जळत्या मेणबत्तीचा हात


वर करुन 'बाबा हनुमानजी जागृत रहे' असे म्हणून पुन्हा एक पाऊल समोर टाकले. पुन्हा थांबलो. स्नेह ओरडतच होती. बाबा हनुमानजी जागृत रहे असे म्हणत म्हणत एक-एक पाऊल पुढे टाकत गेलो. असे करता करता मी दरवाज्याजवळ येऊन पोहोचलो. तिथे एक क्षण थांबुन निर्णय घेतला दरवाजाच्या आत शिरावे म्हणून पुन्हा 'बाबा हनुमानजी जागृत रहे' असे म्हणून डाव्यास पायांनी दरवाजाला जोराने लाथ मारली. तेव्हा दरवाजा एकदम तुटला आणि मी आत शिरलो. तेव्हा तिथे काहीच नव्हते. सगळे शांत होते. सुधीर व स्नेह आरामात झोपलेले होते आणि इथे माझे स्वप्न संपले.

दुसऱ्या दिवशी आम्ही सगळे उठलो. आंघोळ वगैरे आटोपवून आम्ही फिरावयास गेलो. विलीयम्सबर्गला पाहिले. दिवसभर माझ्या मनात स्वप्नाबद्दल विचार येत होते. त्याही रात्री आम्ही झोपलो. पुन्हा तिसऱ्या दिवशी सकाळी उठून शहर पाहायला गेलो. संध्याकाळपर्यंत घरी परत यायचे होते. संध्याकाळी सहा वाजता मी सुधीरला विचारले की परत जातेवेळी तू गाडी चालवशील काय? कारण येतेवेळी मी गाडी चालवली होती. त्यांनी गाडी चालवतो म्हटल्यावर तिथून आम्ही निघालो. सुधीर कार चालवीत होता. सगळे रिचमंडला **(Richmond)** येऊन पोहोचलो. तिथे जेवण घेतले व रात्री नऊ वाजता घरी जाण्यास निघालो. रात्र झाली होती तेव्हा मला वाटले आपणास गाडी चालवायला पाहिजे. तरीपण मी विचारले नाही व त्यांनी देखील मला गाडी दिली नाही. आम्ही तिथून निघालो. सुधीर कार चालवात होता. मी त्याच्या बाजूला बसलो होतो. कार १०० कि.मी. च्या वेगाने चालली होती. निघून १५-२०




१. आमची कार २. दुसरी कार

मिनिटे झाली असतील. आमच्या समोर एक कार होती. तिला ओव्हरटेक करण्याकरिता सुधीर डाव्या बाजुजा आला. तेव्हा त्याची कार डाव्या बाजूलाच चालत गेली ती सरळ झाली नाही. त्यांनी स्टिअरींग खूप फिरविले पण कार सरळ झाली नाही. नंतर ती कार उजवीकडे जाऊ लागली तेव्हा आम्हाला वाटले की जी कार आम्ही ओव्हरटेक केली ती कार आमच्यावर येणार आहे. त्यावेळी सर्वांना कळले की कार कन्ट्रोलमध्ये नाही. त्यामुळे सर्वांना धोका होणार आहे. सर्व ओरडू लागले. वैशाली रडू लागली. मीही ओरडू लागलो. **Slow, Down Burman, Stop, Stop.** नंतर कार एकदम डावीकडे वळली व डावीकडेच जाऊ लागली. ती कार सरळ होतच नव्हती. मी सारखा ओरडतच राहिलो. बर्मन कार थांबव. ती फार फार वेगाने डावीकडे



चालली होती. तेव्हा मला फारच धास्ती वाटली. कारण सर्व कारमध्ये ओरडत होते. वैशाली डॅडी–डॅडी म्हणून रडत होती. तेव्हा मी कारच्या स्टेअरींगवर हात ठेवला. त्यावेळी आमची कार रेलींगला धक्के देत होती. मला असा भास झाला की समोरुन एक मोठा हात कारवर आला आहे. आणि त्या हाताने कारला पकडले आहे. हाताच्या पंजामध्ये कारचा समोरचा भाग आला व कार थांबली असे मला वाटले. आम्ही सर्व हादरुन गेलो होतो. एक मिनिट सर्व शांत बसलो. आम्हाला कळत नव्हते की कार कन्ट्रोलच्या बाहेर कशी गेली? मी माझ्या बाजूने खाली उतरलो. तर माझे पाय रस्त्यावर घसरत होते. मी रस्त्यावर उभा राहूच शकत नव्हतो. तेव्हा माझ्या लक्षात आले की रस्त्यावर बर्फ जमला आहे. त्यामुळे कार खाईमध्ये पडेल व कोणती कार रस्त्यावर राहील हे कोण सांगू शकतो! हे सर्व झाल्यावर मला समजले की, एक दिवसाआधी मी जे स्वप्न पाहिले होते ते सत्य झाले. ज्याप्रमाणे मी स्वप्नात सुधीरचा जीव घेणारी अफाट अशी वाईट शक्ती पाहिली त्याप्रमाणे इथे रस्त्यावरील बर्फ सुधीरचा जीव घेऊ पाहत होता. ज्याप्रमाणे मी स्वप्नात सुधीरच्या खोलीकडे हात वर करुन गेलो त्याप्रमाणे इथेही स्टिअरींगला मी हात पुरवला. स्वप्नात बाबा हनुमानजी जागृत रहे असे म्हटले तसेच इथे पण बाबांचा हात समोर आला व कारला पकडले. जसे स्वप्नात शांत दिसले, तसे इथेही शांत दिसले. ॲक्सीडेंटनंतर मी कार चालवली व घरी सुखरुप पोहोचलो. कारला थोडे फार डॅमेज झाले होते. कार दुरुस्तीला टाकून ते डॅमेज दुरुस्त केले. परमेश्वराच्या कृपेमुळे तसे पाहता कारला काहीच झाले नव्हते. पण काहीही होऊ शकत होते. आमच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना खाई होती. आमची कार खाईमध्ये पडून आमचा सगळ्यांचा जीव जाऊ शकत होता. कोणती कार रस्त्यावर राहणार आहे व कोणती कार रस्ता सोडून देणार आहे हे कोण सांगू शकतो? अशा परिस्थितीत परमेश्वरच मदत करु शकतो. त्याशिवाय दुसरा कोणीही मदत करु शकत नाही.

* * * * *